॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२० ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसरातील संभाव्य पाणी टंचाईकमी करण्यासाठी उदया मंगळवार, दि.२१ मे पासून विद्यापीठस्तरीय जलसंजिवनी श्रमदान शिबिराला प्रारंभ होत असून तीन जिल्हयातील १५० रासेयो स्वयंसेवक यात सहभागी होत आहेत.

राष्ट्रीय सेवायोजनेच्या विभागाच्या वतीने हे जलसंजिवनी श्रमदान शिबिर होत आहे. २५ मे पर्यंत होणाऱ्या या शिबिराला सेवावर्धिनी संस्था, पुणे यांचे सहकार्य मिळणार आहे. नाला बांध बंधारे बांधण्यासाठी व जास्तीत जास्त पाणी अडवीणे, जिरविणे तसेच क्रीडा संकुलालगतचा तलाव खोलीकरण, तलावाच्या भोवती वृक्षारोपण, विहिर पूर्नभरण अशी विविध कामे या शिबिरात केली जाणार असून जळगाव, धुळे, नंदुरबार या तीन जिल्हयातील प्रत्येकी ५० असे एकूण १५० रासेयाचे स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी आदींचा यात समावेश असणार आहे.

उदया मंगळवारी सकाळी ६ वाजता क्रीडा संकुलालगतच्या श्रमदान शिबिराला प्रारंभ होणार आहे. सकाळी ६ ते १० व सायंकाळी ४ ते ७ या काळात हे काम केले जाणार आहे. उदया दुपारी २.३० वाजता औपचारिक उद्‌घाटन सिनेट सभागृहात होणार आहे. दुपारी ३.३० वाजता भोणे येथील सामाजिक कार्यकर्ते चिंतामण पाटील यांचे ` लोकसहभागातून जलसंधारण ` या विषयावर व्याख्यान होईल. बुधवार डॉ.हेमंत पाटील (जळगाव), किशोर शितोळे (औरंगाबाद), गुरुवारी चैत्राम पवार (बारीपाडा) व मोतीलाल पाटील (शहादा) यांचे व्याख्यान होईल. शुक्रवारी सर्जेराव वाघ (औरंगाबाद) यांचे व शनिवारी डॉ.नितीन खर्चे (यवतमाळ) यांचे व्याख्यान होणार आहे.

सोमवारी व्य.प.सदस्य दिलीप पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराच्या पूर्व तयारीचा आढावा घेण्यात आला. यावेळी प्रा.नितीन बारी, अधिसभा सदस्य विष्णू भंगाळे, मनिषा चौधरी व दिनेश नाईक उपस्थित होते. यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचाऱ्यांनी विविध सूचना केल्या. विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी व श्रमसंस्काराचे भान निर्माण व्हावे यासोबतच पाण्यासारख्या ज्वलंत प्रश्नाबाबत जाणीव व्हावी यासाठी हे श्रमदान शिबिर होत असल्याचे दिलीप पाटील यांनी सांगितले. प्रारंभी संचालक डॉ.पंकजकुमार नन्नवरे यांनी प्रास्ताविक केले

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : २० मे, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(डॉ.सुनील पाटील )

जनसंपर्क अधिकारी